# घटस्फोट व पोटगी

- 'कायदेशीर' लग्न म्हणजे काय?
- घटस्फोट म्हणजे काय?
- Marriage Councilling चे महत्त्वाचे कार्य.
- घटस्फोटाची महत्त्वाची कारणे व त्यावरचे उपाय.
- Judicial Seperation / Divorce by Mutual Consent म्हणजे काय व तो घेण्यासाठीची कायदेशीर प्रक्रिया काय.
- पोटगी कशाला म्हणतात? ती मिळण्यासाठी अर्ज कोण करू शकतो.



ॲड. अरुण गो. देशमुख

Scanned by CamScanner

## मनोगत

घटस्फोट आणि पोटगीवरचे पुस्तक हे माझे कायद्याविषयक तिसरे पुस्तक. पोलीस कायदा आणि अटक ह्या पुस्तकाच्या यशस्वी वाटचालीमुळे कायद्याविषयक पुस्तके लिखाणासंबंधात जास्त लक्ष द्यावे असे मनोरमा प्रकाशनाचे श्री. अनिल फडके यांनी मला सुचवले. आणि त्याचेच फलीत म्हणजे पोलीस कायदा आणि अटक ह्या पुस्तकापाठोपाठ श्री. अनिल फडके यांनी माझ्यासमोर विविध कायद्याविषयक विषय ठेवले त्यातीलच हे पुस्तक म्हणजे प्रस्तुत घटस्फोट आणि पोटगीवरचे हे पुस्तक.

घटस्फोट आणि पोटगीवर अनेक पुस्तके असून सुद्धा सर्व पुस्तके ही कायद्याचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तींसाठीच लिहिलेली असल्यागत वाटत राहते. सामान्य माणसाला एकाच पुस्तकात ३-४ वेगवेगळ्या वेळी संमत झालेले कायदे एवढे सरमिसळ होत समोर येतात की त्याला आपल्याला नक्की ह्यातील काय पाहिजे आहे व ते कुठे वाचावयास मिळेल हेच लक्षात येत नाही. माझ्याकडून या सदर पुस्तकात जाणीवपूर्वकरित्या विषय वेगळ्या तऱ्हेने व सोपे करून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

घटस्फोट आणि पोटगीवर पुस्तक लिखाणात तसा पुष्कळच वेळ गेला. ह्याचे प्रमुख कारण ह्या विषयाची व्याप्ती. आज महाराष्ट्रात १०० लग्ने होत असताना त्यातील किमान ४० टक्के जोडपी ही जीवनात कोणत्यातरी वेळी कौटुंबिक न्यायालयाचे दरवाजे ठोठावत आहेत. सामाजिक संस्थांपासून अनेक जणांनी या विषयी चिंता वेळोवेळी व्यक्त केलेली आहेच.

पूर्वी एकत्र कुटुंब पद्धत असायची. ७०-८० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या आजोबा/आजीचे मत महत्त्वाचे ठरायचे. घरात आलेल्या सुनेला साहजिकच आधार असायचा. सासूलाही आपल्यापेक्षा मोठे कोणतरी आहे ह्या गोष्टीची जाणीव असायची व त्यामुळेच जरी भांड्याला भांडं लागलं तरी त्याचा आवाज सहसा चार भिंतींच्या पलीकडे जायचा नाही. पूर्वी प्रत्येक माणसाला सरासरी ३ ते ४ मुले असायची. मुलीचे लग्न होताना पाठवणीच्या वेळी बाप आपल्या मुलीला तुझ्या पाठीवर अजून २-३ जणांची लग्नं होणे बाकी आहेत ह्याची जाणीव करुन देत. सासरकडच्यांना समजून घे, उलट सुलट बोलू नको पासून हे घर तुला कायमचे बंद इथंपर्यंत वेगवेगळे सल्ले दिले जायचे. त्यामुळेच बारीक सारीक काय अगदी मोठ्या प्रमाणावर जरी काही झालं तरी माघारीची वाट आपल्याला बंद असल्याने अन्याय सहन



Scanned by CamScanner

करीत बाई राहायची.

आज परिस्थिती बदलली आहे. एक तर एकत्र कुटुंब पद्धती संपलेली आहे. त्यामुळे सासू-सासरे ( तेही मुलासोबत राहत असतील तर ! ) पलिकडे आज दुसरे कोणीही मोठे घरात नाही आणि त्यामुळे लहान ठिणगीही वणवा पेटवून जात आहे. स्त्रिया आज कमवत्या आहेत. नवऱ्यावर अवलंबून राहणारी स्त्री शोधावी लागेल. मात्र आज घरखर्च चालवण्यासाठी स्त्रीला नोकरीसाठी नाईलाजाने बाहेर पडावे लागत आहे. त्यामुळे उलट बऱ्याच ठिकाणी स्त्रियांनी मिळवलेला पगार हा कुटुंबासाठी आधार असतो.

परत पहाण्यालायक एक गोष्ट आहे ती ही की आज सरासरी घरटे १ वा जास्तीत जास्त २ मुले असल्याने आजचा बाप पाठवणी करतानाच आपल्या मुलीला सांगून ठेवतो की मी जिवंत आहे व कुठलीही अडचण आली तरी माझ्याकडे लगेच निघून यायचे, मी तुला मेलेलो नाही. यामुळे अर्थातच होते एकच की सामंजस्याची भूमिका जी स्त्री चांगली घेऊ शकते तीच मशाल घेऊन अन्याय शोधू लागली आहे. घटस्फोटाचे कारण सामाजिक जवळपास ७५ टक्के असून आई वडिलांची फूस असल्याने काडीमोड घेणारी स्त्री आज पहावयास मिळत आहे.

अर्थात सर्व पुरुष धुतल्या तांदुळागत स्वच्छ आहेत असे काही माझे म्हणणे नाही. स्त्रियांवर खरोखरीच अन्याय होत असेल तर अशा नवऱ्यांना वठणीवर आणण्यासाठी कौटुंबिक न्यायालयासारखी दुसरी जागा नाही... मात्र दुर्दैवाने वकिल म्हणून एक बाब लक्षात येते की आज कायदाच स्त्रियांची बाजू एवढी घेत आहे की कौटुंबिक न्यायालयात स्त्रियांकडे माप झुकते पडत आहे. नवऱ्यांवर खरोखरीच अन्याय होत असेल तर अशा स्त्रियांना वठणीवर आणण्यासाठी कुठेच सोय वा जागा कायद्याने ठेवलेली नाही. यामुळे बऱ्याच वेळेला खोट्या तक्रारी करण्यापर्यंत स्त्रियांची मजल गेली आहे हे दुर्दैवाने लक्षात येत आहे. असो.

सर्वसामान्यपणे घटस्फोट घेण्याकडे मराठी माणसांचा कल नसतो. मात्र जेव्हा तशी गरज पडते तेव्हा घटस्फोट म्हणजे काय व तो कुठे मिळतो हे माहिती घेणे आवश्यक ठरते. कौटुंबिक न्यायालयातून मिळणारा घटस्फोट हा निश्चित स्वरुपाचा व ग्राह्य धरला जातो. मात्र मी काही न्यायालयात पाहिलेले प्रकार हे कायदा धाब्यावर बसवून चाललेले आहेत हे लक्षात येते. मॅरेज रजिस्टारकडून मिळणाऱ्या लग्नाच्या दाखल्याऐवजी मॅरेज डिक्लरेशन ( लग्नाचे घोषणा पत्र ) किंवा कौटुंबिक न्यायालयातून मिळणाऱ्या घटस्फोटा ऐवजी Mutual Divorce agreement सारखे



Scanned by CamScanner

दस्ताऐवज तयार करुन ते नोटरी केले जातात व अमाप पैसा अशा व्यक्तींकडून लुटला जातो. बरे एवढे करुन सदर दस्ताऐवजाची कायद्याच्या भाषेत किंमत शून्य असते. असा झटपटचा घटस्फोट घेऊन पुनर्विवाह करणाऱ्या विरुद्ध जर प्रथम पत्नीने तक्रार केल्यास सर्वच जण गोत्यात येतात. आणि म्हणूनच कायद्याने घटस्फोट मिळण्याची सोय असताना असे चुकीचे पर्याय न निवडण्यासाठी त्या घटस्फोटासंबंधी माहिती सामान्यजनांना करावी असे वाटले म्हणूनच हे पुस्तकाचे लिखाण हाती घेतले.

सदर पुस्तकात मी अनावश्यक किचकट कायदे मुद्दामहून दिलेले नाहीत. सोप्या भाषेत सामान्य व्यक्तिलाही समजतील अशा घटस्फोटांचे प्रकार व कौटुंबिक न्यायालयातील अन्य बाबी मी ह्या पुस्तकात दिलेल्या आहेत.

आपल्यासमोर घटस्फोट आणि पोटगीवरचे हे पुस्तक आणताना मला मनापासून आनंद वाटत आहे. सदर पुस्तक पूर्णपणे संगणकावर टाईप करीत लिहिलेले आहे. सदर पुस्तकाची बरीच पाने ही मी सांगून व माझ्या पत्नीने टाईप करुन लिहिली आहेत. त्यामुळे तिचे तसेच मला नेहमीच प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या आईचे या पुस्तकाद्वारे मी ऋण व्यक्त करीत आहे. ह्या पुस्तकाचे मुद्रणदोष श्री. अरविंद कर्वे यांनी पाहिलेले आहेत. सदर पुस्तकास दोन शब्द मा. श्रं.. अशोक प्रधान यांनी लिहिलेले असून या सर्वजणांचा मी मन:पासून आभार व्यक्त करीत आहे.

हे पुस्तक लिखाण करण्याची संधी मला मनोरमाच्या श्री. अनिल फडके यांचेमुळे मिळाली असून त्यांच्या ह्या पाठिंब्यामुळेच मला ही साहित्य सेवा अखंडीत चालू ठेवता येत आहे व यासाठी मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

या पुस्तकात आपणास काही दोष आढळले तर ते मला जरुर कळवा. तसेच आपणास वाचावयास काय आवडले असते हेही जरुर कळवावे. यामुळे पुढील आवृत्ती अधिक परिपूर्ण होत जाते.

हे पुस्तक सामान्य व्यक्तिसाठी नक्कीच उपयोगी ठरेल अशी मला आशा वाटते. वाचक म्हणून आपले माझ्यावरचे प्रेम यापुढेही असेच वाढत राहील अशीच ईश्वरचरणी प्रार्थना करुन मी माझे मनोगत इथेच संपवतो. हरि ओम...

ॲड. अरुण गोविंद देशमुख



Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका

I. हिंदू विवाह कायदा, १९५५ मधील कलम १३ :
घटस्फोट ( Divorce ) —————— १५-४१

I. अ. घटस्फोटासाठी असणारे सर्वसाधारण नियम व पद्धती
I. ब. कलम १३ घटस्फोटात येणारे विविध कलम व घटस्फोटाच्या तरतुदी
I.क. खालील कारणावरुनही घटस्फोटाच्या मागणीसाठी याचिका होऊ शकते.
I. ड. कलम १३ (१) (i) व्यभिचार
I. इ. कलम १३ (१) (i) (अ) क्रूरता
I. फ. उपकलम ( १ अ ) नपुसंकत्व
I. ग. कलम १३ (१) (i) (ब ) परित्याग
I. ह. कलम १३ (१) (ii) धर्मांतर
I. य. कलम १३ (१) (iii) मानसिक विकृती
I. ज. कलम १३ (१) (iv) असाध्य कुष्ठरोग
I. ल. कलम १३ (१) (v) रतिज रोग
I. म. कलम १३ (१) (vi) संन्यास घेणे कलम
I. न. कलम १३ (१) (vii) सात वर्ष पत्ता नसणे
I. प. कलम १३ ( १आ ) ( १ व २ )
I. स. इतर

II. हिंदू विवाह कायदा, १९५५ मधील कलम ११ व १२ :
विवाहाचे शून्यत्व आणि घटस्फोट
( Nulity of marriage & divorce.. Sec. 11 - Void marriage, Sec. 12 - Voidable marriage) ——— ४२-५६

II. अ. कलम ११ अर्थात - कलम ५ ( १, ४, ५ ) चे विरुद्धचा विवाह
II.ब. निषिद्ध नाते
II.क. सपिंड नाते
II.ड. कलम १२ रद्दबातल विवाह
II.इ. अर्धवटपणामुळे संमती



Scanned by CamScanner

II.फ. संमती कपट
II.ग. कलम १५ : विरुद्धचा विवाह
II.ह. कलम १३ (२) पत्नीला उपलब्ध असलेली उक्त कारणाव्यतिरिक्त अधिक कारणे :
अ) कलम १३ (२)(१) : द्वितीय पत्नीचे अस्तित्व
ब) कलम १३ (२) (२) बलात्कार समसंभोग वगैरे
क) कलम १३ (२)(३) पोटगी
ड ) कलम १३ (२)(४) बाल विवाहितेचे विवाह अमान्य करणे

III. हिंदू विवाह कायदा, १९५५ मधील कलम १३ ब :
एकमेकांच्या संमतीने घटस्फोट होणे
( **divorce by mutual consent** ) ———— ५७-६०
III. अ. संमतीने घटस्फोट घेण्याची कायदेशीर प्रक्रिया
III. ब. सर्वसाधारण विचार

IV. कौटुंबिक वाद - न्यायालय ———— ६१-७६
IV. अ. कौटुंबिक न्यायालयात चालणारे दावे
IV. ब. अधिकार क्षेत्र आणि कार्यपद्धती
IV. क. दावा दाखल करण्यासाठी नमूद करण्याच्या आवश्यक बाबी
IV. ड. याचिकेतील विषयवस्तू व त्याचे सत्यापन
IV. इ. कौटुंबिक न्यायालयात असणाऱ्या समुपदेशनाचे महत्त्वाचे कार्य
IV. फ. कौटुंबिक न्यायालयातील वकीलांची भूमिका

V. हिंदू विवाह कायदा, १९५५ मधील कलम १० :
कायदेशीर फारकत/अलग होणे
( **Judicial Separation** ) ———— ७७-८०
V. अ. खालील कारणावरुन कायदेशीर फारकतही मागता येऊ शकते

VI. हिंदू विवाह कायदा, १९५५ मधील कलम ९ :
दाम्पत्य अधिकार प्रतिस्थापना
( **Restitution of Conjugal Rights** ) ———— ८१-८६
VI. अ. योग्य व रास्त कारण
VI. ब. विसंगत दादी



Scanned by CamScanner

VI. क. अंमलबजावणी

VII. पोटगी ( maintenance ) ———————— ८७-९४

VII. अ. पोटगी ( Maintenance ) कशाला म्हणतात

VII. ब. फौजदारी कार्यपद्धती संहिता कलम १२५ प्रमाणे असणारा पोटगीसाठीचा कायदा

VII. क. फौजदारी कार्यपद्धती संहिता कलम १२६

VII. ड. पोटगीबाबत कायदा काय म्हणतो ?

VII. इ. फेरनिर्णय

VII. फ. सर्वसाधारण

VII. ग. अंतरिम पोटगी ( interim maintenance )

VIII. हुंडाबंदी कायदा ———————— ९५-१०५

VIII. अ.कलम ४९८ अ; हुंडा प्रतिबंधक कायदा

VIII. ब.कलम ३०४ ब

VIII. क.कलम ११३ अ; पुरावा कायदा

VIII. ड.हुंडा प्रतिबंधक कायद्याच्या कलमात असणाऱ्या तरतुदी

IX. घटस्फोट व समाज ———————— १०६-११६

IX. अ. घटस्फोटाचे परिणाम

IX. ब. घटस्फोटाची महत्त्वाची कारणे व त्यावरचे उपाय

IX. क. कलम १५ - घटस्फोटीतांचा पुनर्विवाह

IX. ड. मुलांचा ताबा

IX. इ. मुलांशी भेट

X. संबंधीत इतर बाबी ———————— ११७-१२४

X. अ. कलम ७ हिंदू विवाह विधी

X. ब. अपवादात्मक हालअपेष्टा आणि अपवादात्मक नीतिभ्रष्टता

X. क. मनाई हुकूम ( injunction order )

X. ड. कौटुंबिक न्यायालयातील दाव्यांचे वर्गीकरण

X. इ. दाव्यासाठीचे कोर्ट फी/प्रोसेस फी शुल्क

X. फ. अपिल



Scanned by CamScanner

XI. प्रश्न मनातले उत्तर कायद्याचे ———————— १२५-१३०

१. लग्न झाले कधी म्हणता येते ?

२. घटस्फोट घेणे म्हणजे काय ?

३. कायदेशीर अलग झालेला दुसरा विवाह करु शकतो का ?

४. संमतीने दोषारोप/शाब्दिक चिखलफेक न करता घटस्फोट घेता येतो का ?

५. घटस्फोट देण्यास नकार देता येतो का ?

६. हुंडा प्रतिबंधक कायद्याखाली खोटी तक्रार केल्यास काय करावे ?

७. दाम्पत्य अधिकार प्रतिस्थापनेचा हुकूमनामा करता येतो ?

८. पोटगी ( Maintenance ) कशाला म्हणतात ?

९. पोटगी न देणे हा कोणत्या कायद्याखाली गुन्हा ठरतो ? व त्यावरची कारवाई...

१०. घटस्फोट व पोटगीबाबत लागलेल्या निकालाविरुद्ध कुठे अर्ज करता येतो ?

११. कायद्याने गरीबांसाठी केलेल्या सरकारी वकीलांची सोय.

१२. घटस्फोटास जोडीदाराची संमत्ती नसली तरी दावा करता येतो का ?

१३. पोटगी अर्ज दाखल केल्यापासून पोटगी मिळते का निकालाच्या तारखेपासून ?

१४. लहान मुलाचा सर्वसाधारण ताबा आईकडे दिला जातो. हे लहानपण कधीपर्यंत धरले जाते ?

१५. नपुसंकत्वात जोडीदाराची वैद्यकीय तपासणीसाठी मागणी करता येते का ?

१६. आर्थिक चांगली स्थिती असतानाही पोटगी अर्ज करता येतो का ?

१७. पोटगीची टाळाटाळ केल्यास फौजदारी गुन्हा दाखल करता येतो का ?

१८. पोटगीचे पैसे कसे देता येतात ?

१९. घटस्फोटासाठी किती वर्षे अलग राहिले पाहिजे ?

२०. फसवलेल्या व्यक्तीला घटस्फोट कधी मागता येतो ?

२१. ४९८ चा बागुलबुवा दाखवणाऱ्या पत्नीवर उपाय काय ?

२२. घटस्फोटीत व्यक्ती कधी लग्न करु शकते ?

२३. घटस्फोट, पोटगी कायदा फक्त हिंदू धर्मियांसाठीच लागू आहे

२४. मेहेरची रक्कम घेतल्यावरही पोटगी मागता येते का ?



Scanned by CamScanner

२५. आपल्या मुला/मुलीला भेटण्याचा अधिकार कौटुंबिक न्यायालय देते का ?

२६. मुलाचा ताबा देताना मुलांचे मत विचारात घेतले जाते का ?

२७. एक दावा चालू असताना कौटुंबिक न्यायालयात दुसरा दावा दाखल करता येतो का ?

२८. कौटुंबिक न्यायालयात अर्ज दाखल करताना लग्नाचे प्रमाणपत्र ( मॅरेज सर्टिफिकेट ) आवश्यक आहे का ?

२९. कौटुंबिक न्यायालयात पती-पत्नी मुलां व्यतिरिक्त त्यांच्या आई-वडीलांचा जाबजबाब घेतला जातो का ?

३०. व्यभिचाराच्या आरोपाच्या वेळी पुरावा कोणता ग्राह्य धरला जातो ?

३१. कौटुंबिक न्यायालयातील भाषा कोणती आहे/वा चालते ?

३२. कौटुंबिक न्यायालयात मानसोपचार तज्ञांची मदत मिळते का?

३३. विवाह समुपदेशक ( मॅरेज कौन्सिलर ) ह्यांचे प्रशिक्षण काय असते ?

३४. कौटुंबिक न्यायालयात वकीलाशिवायही दावा लढता येतो का ?

३५. दाव्याच्या दिवशी सकारण अनुपस्थिती असल्यास काय करावे ?

३६. समोरचा पक्ष सातत्याने गैरहजर राहात असल्यास काय करावे?

३७. वादविवाद घडत असल्यास कौटुंबिक न्यायालयात प्रथम जावे का तो अंतिम मार्ग म्हणून निवडावा ?

३८. वैवाहिक अडचणींवर तोडगा काढण्यासाठी जर विवाह समुपदेशक ( मॅरेज कौन्सिलर ) यांची मदत पाहिजे असेल तर कौटुंबिक न्यायालयात दावा करणे आवश्यक आहे का ?

३९. कौटुंबिक न्यायालयात दावे पक्षकारांच्या मुलांमध्ये अडचण असल्यामुळे असल्यास काही उपाय आहे का ?



Scanned by CamScanner



# I) हिंदू विवाह कायदा, १९५५ मधील कलम १३ : घटस्फोट

## I अ) घटस्फोटासाठी असणारे सर्वसाधारण नियम व पद्धती

आजच्या घडीला घटस्फोट हा शब्द परिचयाचा होण्याइतपत नियमित ऐकला जात आहे. घटस्फोट मिळण्यासाठी पती वा पत्नी कोणीही दावा दाखल करु शकतात.पत्नीला सदरचा दावा दाखल करताना निशुल्क सोय असते तर पतीला मात्र रु. १५० अधिक रु. ५० चे कोर्ट फी स्टँप दाव्या-सोबत लावावे लागतात. सदर दावा करताना दाव्या सोबत लग्न झाल्याचा पुरावा म्हणून शक्यतो लग्नाचे प्रमाणपत्र, लग्नातील एकत्र असलेला फोटो, आयकार्ड आकाराचे स्वत:चा किमान एक फोटो, मुल असल्यास त्याचा जन्म दाखला, रेशन कार्ड, रोजनामा, वकिलातर्फे दिलेल्या नोटीशीची व त्याच्या पोच पावतीची प्रत, इतर ज्या बाबी महत्त्वाच्या आहेत व लिखित स्वरुपात आहेत त्या सर्वांचे झेरॉक्स प्रति ( न्यायालयात जमा करण्यासाठी २ प्रति व किमान एक प्रत स्वत:साठी ) काढून लावायच्या असतात.

घटस्फोट मिळण्यासाठी दावा दाखल केल्यावर विवाह समुपदेशक दोन्ही पक्षांशी अर्थात पती व पत्नींशी या विषयावर सखोल बोलून वैवाहिक जीवनातील आलेल्या अडचणी चर्चेने दूर करण्याचा प्रयत्न करीत असतो. सदर बाबतीत पती व पत्नीला एकमेकांबद्दल जे सांगावयाचे असेल ते एकांतात सांगायचे असल्यास अशा प्रसंगी विवाह समुपदेशक सदर पती व पत्नी बरोबर एकांतात चर्चा करुन वैवाहिक जीवनात असणाऱ्या अडचणींची माहिती करुन घेतो व त्यानुसार सुयोग्य तोडगा काढण्याचा प्रयत्न करतो,



Scanned by CamScanner

सदर विवाह समुपदेशक त्याने केलेल्या चर्चेचे सार व थोडक्यात कथा मांडून सदर बाब न्यायाधिशांकडे आदेशासाठी पाठवतो.

पूर्वी घटस्फोट मिळण्याची आणि कायदेशीर फारकत मिळण्याची कारणे निरनिराळी होती. पतीने पत्नीला टाकून देणे व क्रुरतेने वागवणे या कारणावरुन फक्त कायदेशीर फारकत मिळत असे. तसेच वेडेपणा, कुष्ठरोग, रतिज रोग याची तीव्रता नसेल तर कायदेशीर फारकत मिळे आणि जास्त तीव्रता असेल तरच घटस्फोट मिळे. घटस्फोटाची कारणे भिन्न होती. धर्मांतर करणे, संन्यासी होणे, सात वर्षे पत्ता नसणे वगैरे कारणांवरुन घटस्फोट मागता येत असे. या सर्व तरतुदी एक करुन १९७६ च्या दुरुस्तीनंतर त्या सर्व कलम १३ खाली एकत्र आणल्या आहेत. या कारणांच्या गंभीरतेवरुन कायदेशीर फारकत द्यावयाची का घटस्फोट द्यावयाचा हे न्यायाधिशाने सारासार विचार करुन ठरवायचे आहे. कायदेशीर फारकत मिळाल्यानंतर दोन वर्षांनंतर घटस्फोट मिळू शकतो.

## I. ब) कलम १३ घटस्फोटात येणारे विविध कलम व घटस्फोटाच्या तरतुदी

१३ (१) ह्या कायद्याप्रमाणे हा कायदा अस्तित्वात येण्याच्या पूर्वी किंवा नंतर संपन्न झालेला कोणताही विवाह, पती-पत्नींपैकी कोणीही, घटस्फोटासाठी खालील कारणांवरुन दावा दाखल केल्यास मिळू शकतो.

१३ (१) (i) विवाह संपन्न झाल्यानंतर गैरअर्जदाराने स्वत: होऊन पती/पत्नी विरहीत अन्य व्यक्तीबरोबर संभोग केला असेल, किंवा

(i अ) विवाह संपन्न झाल्यानंतर अर्जदाराने गैरअर्जदार क्रुरतेने वागविले असेल किंवा

(i ब) याचिका दाखल करण्यापूर्वी गैरअर्जदाराने कमीत कमी दोन सलग वर्षे अर्जदाराचा परित्याग केलेला असेल ( परित्याग याचा अर्थ म्हणजेच अर्जदार पतीचा/पत्नीचा गैरअर्जदार पत्नीने/पतीने कारणाशिवाय आणि अर्जदाराच्या संमतीशिवाय अगर इच्छेविरुद्ध त्याग करणे होय. यामध्ये अर्जदारास गैरअर्जदाराने हेतूपूर्वक निष्काळजीपणाने वागवणे हा अर्थ अंतर्भूत होतो.) किंवा

१३ (१) (ii) धर्मांतर करुन गैरअर्जदार अहिंदू झाला असेल किंवा

१३ (१) (iii) गैरअर्जदार हा सुधारणार नाही असा अर्धवट असेल



Scanned by CamScanner

किंवा अर्जदार त्याच्याजवळ राहील अशी रास्तपणे अपेक्षा बाळगता येणार नाही. किंवा मानसिक विकृतीने पछाडलेला असेल;

स्पष्टीकरण :

अ) मानसिक विकृती म्हणजे मानसिक आजार ज्यात मनाची खुंटलेली अगर अपुरी वाढ किंवा मनाची कोणतीही विकलवस्था आणि तडा गेलेले दुहेरी व्यक्तिमत्व.

ब) मनोव्यापार विषयक विकृती म्हणजे ज्या अवस्थेला औषधाची गरज अथवा उपयोग असो व नसो ज्या अवस्थेमुळे व्यक्तीची वागणूक प्रतिपक्षाच्या बाबतीत असाधारणपणे आक्रमक किंवा गंभीररित्या बेजबाबदार होते, अशी सतत टिकणारी मनाची विकृती अगर विकलता.

१३ (१) (iv) गैरअर्जदार हा न सुधारण्यासारख्या तीव्र स्वरुपाच्या कुष्टरोगाने पछाडलेला असेल किंवा

१३ (१) (v) गैरअर्जदार यास संक्रमित होऊ शकणाऱ्या रतिज रोगाने पछाडलेला असेल किंवा

१३ (१) (vi) गैरअर्जदार याने संन्यास घेऊन एखादा धर्मपंथ स्वीकारला असेल किंवा

१३ (१) (vii) गैरअर्जदार जरी मेलेला नसला त्याच्या जिवंतपणाबद्दल सात किंवा जास्त वर्षे ऐकलेले नसेल.

## I क) खालील कारणावरुनही घटस्फोटाच्या मागणीसाठी याचिका दाखल होऊ शकते :

१३ (१) (अ) ह्या कायद्यान्वये पती-पत्नीपैकी, कोणीही खालील कारणावरुनही घटस्फोटाच्या मागणीसाठी याचिका दाखल करु शकतात.

१) पती-पत्नीमध्ये कायदेशीर फारकतीचा हुकुमनामा झाल्यानंतर एक वर्ष किंवा त्याहून जास्त काळ ते दोघे जण पती-पत्नी या नात्याने राहिलेले नाहीत किंवा

२) पती-पत्नीमध्ये दाम्पत्य अधिकार प्रतिस्थापनेचा हुकूमनामा झाल्यानंतर अगर एक वर्षापेक्षा जास्त काळ त्या दोघांमध्ये दाम्पत्य अधिकाराची प्रतिस्थापना झाली नाही.

१३ (२) पत्नी खालील कारणावरुही घटस्फोटाच्या मागणीसाठी याचिका दाखल करु शकते :



Scanned by CamScanner